दैनिक
# मुक्तागिरी
थेट संवाद आपल्याशी...!

बुधवार, दि. १६ मार्च २०२२

## प्रा.डॉ.सुभाष वाघमारे यांच्या 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव'ला वामनदादा कर्डक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

### कवितासंग्रहास आजपर्यंत दहा पुरस्कार मिळाल्याने सर्वत्र अभिनंदन



सातारा : येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. सुभाष वाघमारे यांच्या 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव' या कवितासंग्रहास जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाने १४ मार्च २०२२ रोजी वामनदादा कर्डक राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केला. जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त येत्या २७ मार्च दिवसी दीक्षाभूमी सभागृहात त्यांना पुरस्कार देऊन त्यांच्यासह ५० राष्ट्रीय व १०० राज्यस्तरीय पुरस्कार मानकरी यांचा सन्मान केला जाणार आहे. या समारंभास प्रमुख अतिथी भदंत नागार्जुन सुरई ससाई, राज्याचे उर्जामंत्री नितीन राऊत, मागासवर्गीय कल्याण मंत्री विजय वडे वटीवार, मेंदुरोग तज्ज्ञ डॉ.चंद्रशेखर मेश्राम, वनराईचे अध्यक्ष डॉ.गिरीश गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुभाष चौधरी आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष डॉ.दीपककुमार खोब्रागडे यांनी दिली. त्यांच्या या यशाबद्दल छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ.विठ्ठल शिवणकर, शिवाजी ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील, ऑडीटर प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे, प्रा.डॉ.बाबुराव उपाध्ये, उपप्राचार्य डॉ.अनिलकुमार वावरे आदी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

प्रा.डॉ.सुभाष वाघमारे हे मुळचे मळोली.ता.माळशिरस .जिल्हा सोलापूर या गावचे रहिवासी असून त्यांचे शिक्षण छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये झाले. ३१ वर्षे रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून काम करताना त्यांनी विवेक वाहिनी सारख्या विकास उपक्रमात मोठे कार्य केले आहे. अलीकडे ५ जून २०२१ रोजी त्यांच्या संविधानाच्या स्वप्नातलं गाव या कवितासंग्रहाचे प्रकाशन ८९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.श्रीपाल सबनीस व रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.विठ्ठल शिवणकर यांच्या हस्ते झाले होते. या कविता संग्रहास वाचन संस्कृती प्रतिष्ठान चा राज्यस्तरीय समाज प्रबोधन पुरस्कार ,छत्रपती शिवाजी कॉलेजचा सर्जनशील साहित्य लेखन पुरस्कार,तसेच गारगोटी येथील न्यूज पेपर गंगाधर पुरस्कार. तसेच तरवडी येथील सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील साहित्य पुरस्कार, शंब्दकळा साहित्य संघ मंगळवेढा यांचा काव्य पुरस्कार,श्रीरामपूर येथील प्रकाश किरण पुरस्कार, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचा ललित साहित्य पुरस्कार,फलटण येथील उत्कृष्ट साहित्यसेवा पुरस्कार असे आठ पुरस्कार मिळाले असून सृष्टी साहित्य पुरस्कार अकोला हा नववा व हा वामनदादा कर्डक पुरस्कार दहावा जाहीर झाला आहे.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.